Renew ... शासन पत्र

**कायम विनाअनुदान तत्वावर**
**(माध्यम इंग्रजी)**

जा.क्र प्राशि-३/खाप्राशा/मा.इंग्रजी/१०-११
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१. यांचे कार्यालय.
दिनांक : 26 ... 2011

प्रति
१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,
२. शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,पिंपरी चिंचवड,पुणे.

विषयः सन २००९ - २०१० या शैक्षणिक वर्षात नविन खाजगी प्राथमिक शाळेस परवानगी देणेबाबत.(माध्यम - इंग्रजी) . . .

संदर्भः १. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्रमांक नप्राश १००८/प्र.क्र.६७८/प्राशि-३, दिनाक १८ ऑगष्ट २००९.
२. या कार्यालयाचे पत्र क्र.शिऊसं/प्राशि ३/नखाप्राशा/पुवि-०९/२१२४६-५० दिनांक २/१२/२००९.
३. आपले पत्र क्र. शिक्षण/खाप्राशा/३/कावि/११९/१० दिनांक २३/३/२०११

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकनी घ्यावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून २००९ पासून इ. १ ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) सन २००९-२०१० या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर खाजगी प्राथमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्वावर भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६ |
| १ | श्री.कृष्ण सेवा संघ आणि चॅरिटेबल ट्रस्ट,प्लॉट नं.२४२,जनक प्राधिकरण,निगडी,पुणे ४४. | कल्पना इंग्लिश मिडी स्कूल,प्राधिकरण,निगडी, पुणे. | १ ली | इंग्रजी | जून २००९ पासून |

सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास शाळा परवानगी आपोआप रद्द होईल.

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणाकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३. शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्यतेने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

PRINCIPAL

उपरोक्त परीक्षा केंद्र क्रमांक फेब्रुवारी/मार्च २०१७ उच्च माध्यमिक परीक्षेच्या विद्यार्थ्यांचे आवेदनपत्रावर विहित ठिकाणी लिहीणे आवश्यक आहे.

विभागीय मंडळाकडे संलग्नतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावामध्ये खाली नमुद केलेप्रमाणे त्रुटी आहेत.

१...........................................................................................................

२...........................................................................................................

३...........................................................................................................

उपरोक्त त्रुटींची पुर्तता या शैक्षणिक वर्षा अखेरपर्यंत १५ डिसेंबर २०१७ पर्यंत करावी. विभागीय मंडळाकडून दिलेला तात्पुरता सांकेतांक क्रमांक कायम करण्यासाठी राज्य मंडळाचे पत्र क्र रा.म./परीक्षा- ३/७४८९ दि. ०४ सप्टेंबर २००६ नुसार आपल्या कनिष्ठ महाविद्यालयास दिलेला तात्पुरता सांकेतांक क्रमांक वर्ष २० पर्यंत प्रत्येक वर्षी त्या शैक्षणिक वर्षात १५ मे पर्यंत विहीत नमुन्यात शुल्कासह प्रस्ताव सादर करुन नुतनीकरण करुन घेणे आवश्यक आहे.(१५ मे २०२२ पर्यंत)

वरील पध्दतीने व कालावधीत नूतनीकरण करुन घेतल्यानंतर सन २०२१-२२ वर्षी असणारा सांकेतांक क्रमांक कायम स्वरुपी प्रदान करण्यात येईल.

विभागीय मंडळाने दिलेली मंडळ संलग्नता खालील अटी/शर्तीचा भंग केलेस आपोआप रद्द होईल.

१. कायम स्वरुपी सांकेतांक मिळेपर्यंत नूतनीकरण करुन न घेतल्यास.

२. परीक्षेसाठी मागणी केलेनुसार केंद्रसंचालक/पर्यवेक्षक/परीक्षक/नियामक/मुख्य नियामक/ प्राश्निक इत्यादी मनुष्यबळ पुरविणेस नकार देणे.

३. माध्यमिक परीक्षा संचालनासाठी भैतिक सोयी सुविधा पुरविणेस नकार देणे.

४. विभागीय मंडळाने दिलेले आदेश व सूचनांचे पालन न करणे.

५. प्रत्येक वर्षी मंडळाने विहित केलेली नोंदणी शुल्क न भरणे.

६. परीक्षा संचालनामध्ये शाळेतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांनी गैरप्रकार करणे.

७. तात्पुरत्या सांकेतांक क्रमांकाचे नुतनीकरण प्रत्येक वर्षी न करता अनधिकृतरित्या वापरणे.

८. शिक्षण संक्रमण अंकाची नोंदणी करावी, तसेच मंडळ प्रकाशने विकत घ्यावीत.

९. कायम स्वरुपी विद्यार्थी संख्येनुसार प्रतिवर्षी रजिस्ट्रेशन फी भरावी.

१०. उपरोक्त प्रमाणे ५ वर्षे नुतणीकरण करावे.

प्र. विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११००५

प्रत माहिती तथा कार्यवाहीसाठी:

१. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.

२. शिक्षणधिकारी, जिल्हा परिषद, जिल्हा:..पुणे...

३. पुणे विभागीय मंडळातील सर्व शाखा प्रमुख.